# भा.कृ.अनु.प.—केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

## कापसाच्या लागवडीसाठी १८ ते २४ जून २०१५ या कालावधीसाठी आठवडी सल्ला

(३१ वा मानक आठवडा)

‘‘हा सल्ला राज्यातील कृषी विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवर आधारित आहे’’

हवामानासंबंधी सल्ला

| महाराष्ट्र | जूनमधील पाऊस | | | | | | सल्ला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | |
| जळगांव | २१ | १२ | १० | ३० | १३ | १ | वर नमूद केलेल्या आठवडयात कोरडवाहू पट्टयात येणाऱ्या या सर्व जिल्हयात कापसाची पेरणी ताबडतोब करणे गरजेचे आहे कारण जुलै महिन्यात दुसऱ्या व तिसऱ्या आठवडयात पावसाचा तुटवडा भासणार आहे. जर पेरणी उशीरा म्हणजे जुलै महिन्याच्या पहिल्या आठवडयात केली तर पिकांना पाण्याचा तुटवडा भासवू शकतो. |
| यवतमाळ | १६ | ३० | २३ | १२ | १० | १० | |
| नांदेड | २२ | ९५ | १७ | ७ | ६ | ० | |
| अमरावती | ५ | १८ | ६ | २९ | १३ | १ | |
| बुलढाणा | ६ | ३९ | ५ | ९ | ४ | ० | |
| औरंगाबाद | १८ | २४ | ६ | २३ | २२ | ९ | |
| जालना | ८ | ३९ | ४ | ८ | ४ | ९ | या सर्व जिल्हयात पेरणीयोग्य पाऊस झालेला आहे. या सर्व जिल्हयात पेरणीसाठी लवकर परिपक्व होणारे वाण संकरीत वाणाचे बियाणे निवडावे. जर कापसाची पेरणी जुलै महिन्यात झाली तर ते पीक रोपावस्थेत असतांना जुलै महिन्याच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवडयात पडणाऱ्या पावसाच्या तुटवडयास बळी पडू शकते. या वर्षाच्या पावसाच्या अंदाजानुसार बीटी संकरित वाणाची ९०×३० सेंटीमीटर एवढया अंतरावर कोरडवाहू भागात पेरणी करावी. दाट पेरणीपद्धतीमध्ये लावण्यात येणाऱ्या गैर बीटी वाणांची पेरणी २५ जुलैपूर्वी करावी यासाठी हलक्या जमिनीसाठी ४५×१० सेंटीमीटर किंवा ६०×१० सेंटीमीटर तसेच मध्यम जमिनीसाठी ७५×१० किंवा ९०×१० सेंटीमीटर हलक्या किंवा पाण्याची सोय असलेल्या जमिनीमध्ये या अंतरावर पेरणी करावी. |
| परभणी | १३ | ३२ | ७ | ५ | ३ | ३ | |
| अकोला | ३ | २२ | ६ | ७ | ५ | ५ | |
| बीड | १० | २५ | १७ | ७ | ४ | २९ | |
| वर्धा | ९ | १८ | १२ | १३ | ११ | ७ | |
| धुळे | २१ | ७ | १० | ३० | १३ | ६ | |
| वाशिम | ९ | ३० | १६ | ७ | ७ | ३ | |
| नागपूर | ५ | ७ | १६ | २९ | १६ | ४ | |
| चंद्रपूर | १६ | १० | ११ | १७ | १५ | ६ | |